# तारापूर एज्युकेशन सोसायटी,

## ७६ व ७७वी वार्षिक सर्वसाधारण सभा

स.न.वि.वि.

तारापूर एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२६/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० बाजता आभासी (Virtual/Online) पद्धतीने आयोजित केली आहे. तरी सदर सभेत सहभागी व्हावे, ही विनंती. (आभासी पद्धतीने सभेत होण्यासाठी - Tarapur Education Society General Body Meeting, Time – 26 September 2021, 11.00 a.m. Join Zoom Meeting. संस्थेचे **अध्यक्ष व विश्वस्त मा.श्री.हरेश्वर दामोदर सावे** यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी आभासी पद्धतीने सभेस उपस्थित राहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१. सन २०१८-१९ (७५ व्या) वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०१९ - २० व २०२०-२१ सालचा संस्थेचा अहवाल सभेस अंतिम मंजूरीसाठी सादर करणे.
३. सन २०१९ - २० व २०२०-२१ सालचा संस्थेचा व संस्था संचलित सर्व विभागांचा जमाखर्च सभेस सादर करून कायम करणे.
४. सन २०२१ - २२ सालाकरिता संस्थेचे अंदाजपत्रक सभेस सादर करून कायम करणे.
५. सन २०१९ - २० व २०२०-२१ सालचा शाळेचा अहवाल सभेस सादर करून कायम करणे.
६. सन २०१९ - २० व २०२०-२१ सालचा शाळेचा जमाखर्च सभेस सादर करून कायम करणे.
७. सन २०२१ - २२ सालाकरिता शाळेचे अंदाजपत्रक सभेस सादर करून कायम करणे.
८. सन २०२१ - २२ सालाकरिता संस्थेच्या हिशेब तपासणीकरीता सनदी लेखापालाची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणे.
९. सन २०२१ -२२ सालाकरिता संस्थेच्या हिशेब तपासणीकरीता स्थानिक हिशेब तपासनीसांची निवड करणे.
१०. मा.धर्मदाय उप आयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,ठाणे यांचेकडून आलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१(अ) अन्वये घटना दुरूस्तीबाबत प्रलंबीत असलेल्या निर्णयाबाबत सर्वसाधारण सभेत माहिती देणे.
११. संस्थेच्या विविध विभागांतील चालू वर्षी झालेल्या ठळक घडामोडींचा आढावा घेणे.
१२. संस्थेचे बदलाचे अहवाल मा.धर्मदाय उप आयुक्त,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,पालघर यांचेकडे सादर करण्यासाठी संस्थेच्या पदाधिका-यांना अधिकार देण्याबाबत.
१३. सभासदांकडून आलेल्या लेखी सुचनांचा विचार करणे.
१४. मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

### विशेष सुचना

१. ज्या सभासदांस सर्वसाधारण सभेसाठी लेखी सुचना पाठवायच्या असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयात सोमवार दि.२०.०९.२०२१ रोजी संध्याकाळी ४.०० वाजेपर्यत पाठवाव्यात. त्यानंतर आलेल्या सुचनांचा विचार केला जाणार नाही. सुचनांसाठी **Mail ID :- tarapuredusociety@gmail.com**
२. केंद्र आणि महाराष्ट्र शासनाच्या कोविड-१९ बाबतच्या सूचनांचे पालन करण्यात येईल.
३. सदर (Virtual/Online) आभासी सभा ही शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार घेण्यात येत आहे. झूम मिटिंग आयडी व पासकोड मिटिंगच्या अगोदर आपल्या मोबाईलवर SMS द्वारे पाठविण्यात येईल. तसेच संस्थेचा अहवाल वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल.

वेबसाईट :- https:// **www.tesociety.in** - Mail ID :- tarapuredusociety@gmail.com

**सूचना :** गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच लिंकवर ती सभा अर्ध्या तासानंतर सुरू होईल याची कृपया नोंद घ्यावी.

तारापूर
दि.०९.०९.२०२१

उदयन हरेश्वर सावे
कार्यवाह

केसरीनाथ ना.सावे
उपाध्यक्ष

तारापूर एज्युकेशन सोसायटी